✳ प्रकरण दुसरे ✳

# ✳ मराठी ग्रामीण कथेतील उत्तम बंडू तुपे यांचे स्थान ✳

## * प्रकरण दुसरे *

# * मराठी ग्रामीण कथेतील उत्तम बंडू तुपे यांचे स्थान *

ग्रामीण साहित्य हा वाङ्मय प्रवाह मराठी ग्रामीण साहित्यात फार मोठ्या प्रमाणात उदयाला आलेला महत्त्वाचा वाङ्मयमयीन प्रवाह आहे. ग्रामीण साहित्य म्हणजे काय? ग्रामीण कथेची पूर्वपीठिका, ग्रामीण कथेच्या प्रेरणा, ग्रामीण कथेच्या विकासाचे टप्पे या मुद्यांच्या आधारे ग्रामीण कथा प्रवाहात उत्तम बंडू तुपे यांचे स्थान निर्धारण करण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

'ग्रामीण साहित्य हे ग्रामजीवनातील अनुभूतीचे चित्रण करणारे साहित्य' असे ढोबळ मानाने म्हणता येईल. रा.गो.चावरे यांनी ग्रामीणतेचा स्वरूप विचार ग्रामीण कथेच्या संदर्भात पुढीलप्रमाणे मांडलेला आहे.

''ग्रामीण कथा हा साहित्य कलेच्या दृष्टीने इतर वाङ्मय प्रकाराप्रमाणेच एक कथा वाङ्मय प्रकार आहे. ग्रामीणत्व हे प्रस्तुत कथेचे वैशिष्ट्ये ठरावे. ग्रामीण परिसरातील निसर्ग, शेती, तेथील माणसांची मातीशी असलेली बांधिलकी, त्या विशिष्ट प्रादेशिकतेशी संबंधित व्यवसाय, लोकाचार, तेथील सामाजिक, धार्मिक, राजकीय जीवनपद्धतीतील वैशिष्ट्यपूर्णता, त्यांच्या समस्या, प्रश्न, मर्यादा व एकूणच ग्रामीण संस्कृतीचे आकलन या कथेतून प्रच्छन्नतेने / स्पष्टपणे अविष्कृत होते. एका आगळ्या जीवन प्रकाराचे वैशिष्ट्य निर्देशित करणाऱ्या कथेचा हा कलाविष्कार होय.''[१]

ग्रामीण कथा, ग्रामीण साहित्यातील प्रमुख वाङ्मय प्रकार त्याचे वैशिष्ट्ये सांगताना डॉ.नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात ''ग्रामीण साहित्य हे व्यक्तिकेंद्रित तर असतेच, पण त्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत कृषिकेंद्रित संस्कृती, या संस्कृतीने निर्माण केलेले लोकमानस या संस्कृतीसाठी निर्माण झालेला गावगाडा (किंवा तत्सम कृषिपयोगी समाजरचना) इत्यादी घटक जबाबदार असल्याने त्या व्यक्तिमत्त्वाला केंद्रस्थानी ठेवून लिहित असताना उपरोक्त घटक सहजपणे

ध्वनित होतात आणि त्यातून ग्रामीण साहित्य आकार घेत जाते.''[२]

वरील वैशिष्ट्ये ग्रामीण कथेत आपल्याला दिसून येतात.

या ग्रामीण कथेची पूर्वपीठिका व तिचा विकास थोडक्यात पाहणे महत्त्वाचे आहे.

'म.फुले' यांनी १८८३ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात पुरोहितवर्ग, गावकामगार आणि शासनव्यवस्थेतील नोकरशाही हे शेतकऱ्यांचे खरेखुरे शोषक आहेत हे सांगत असताना शेतकऱ्यांचे अज्ञान आणि रूढीप्रियता मांडण्याचा प्रयत्न केला आहे. 'शेतकऱ्यांचा आसूड' हा ग्रंथ फुल्यांच्या चिंतनशीलतेची झेप दाखवितो. त्याचबरोबर वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने तो सरस असल्याचे जाणवते. फुलेंच्या लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे संपूर्ण लेखन पद्धती संवादात्मक आहे. सूक्ष्मनिरीक्षण हे दुसरे वैशिष्ट्ये आहे. या फुलेंच्या लेखनाविषयी आनंद यादव म्हणतात, ''म.फुल्यांनी आपल्या गद्य-पद्य लेखनासाठी परंपरागत देशी प्राकृत प्रचूर ग्रामीण भाषेचा वापर केलेला दिसून येतो. पद्यासाठी त्यांनी संत आणि शाहीर या लोकसंस्कृतीच्या सनातन प्रकारची भाषा वापरली, तर गद्यासाठी जनसामान्यांची बोलीभाषा प्राचुर्याने वापरली. शिवाय मराठी लोकसाहित्याचे शैलीगुण अभिव्यक्तीच्या मांडणीसाठी वापरले. त्यामुळे त्यांचे साहित्य एका बाजूने ग्रामीण देशी लोकसाहित्य परंपरेशी नाते जोडते आणि आधुनिकतेशीही आशयाच्या अंगाने नाते जोडते.''[३]

'हरिभाऊंनी १८९७ मध्ये महाराष्ट्रात जो दुष्काळ पडला होता त्यावर १८९८ च्या सुमारास 'काळ तर मोठा कठीण आला' ही वेगळ्या प्रकारच्या जीवनाचा पैलू व्यक्त करणारी कथा लिहिली. या कथेमधून हरिभाऊंचे व्यक्तिमत्त्व समकालीन वास्तवाशी कसे नाते राखून होते हे जाणवते. ना.गोखल्यांच्या गैरहजेरीत डेक्कन सभेचे सचिव म्हणून काम करत असताना त्यांना दुष्काळाचे भविष्य रूप दिसले. त्या प्रसंगामधून या कथेचे लेखन झाले आणि पहिली ग्रामीण कथा मराठीत अवतरली. रामजीबाबा धायगुडे आणि त्यांचे कुटुंबीय दुष्काळात कसे होरपळून निघतात हे हरिभाऊंनी या कथेत

प्रकट केले आहे.

शि.म.परांजपे यांच्या 'एका खडी फोडणाऱ्याची गोष्ट' या कथेतही दुष्काळात होरपळून निघणारी ग्रामीण माणसे चित्रित झाली आहेत. ग्रामीण माणसाविषयी असणाऱ्या कळवळ्यातून ही कथा बरीच प्रत्ययकारी असल्याचे जाणवते.

❑ १९२० ते १९४०

भा.रा.तांबे यांच्या 'गुराख्याचे गाणे' या कवितामधून आधुनिक मराठी जानपद काव्याचा प्रारंभ दिसतो. तसेच 'घट तिचा रिकामा' , 'घट भरे प्रवाही बुडबुडुनी' यासारख्या कवितांमधून कृषिपरिसर साकारताना दिसतो. यातील सर्वच कविता श्रेष्ठ आहेत असे नव्हे. तर रवीकिरण मंडळातील जानपद कवितांचा हा पूर्वावतार असल्याचे जाणवते. 'कवी चंद्रशेखर' यांचे 'काय हो चमत्कार' आणि 'गिरीशांचे', 'आंबराई' अशा शेतकरी जीवनावरील दोन खंडकाव्यांचा उल्लेख करावा लागतो.

ग्रामीण जीवनाविषयीच्या वाङ्मयीन जाणीवा प्रथम 'वि.स.सुखटणकर' यांनी मराठी साहित्यात आणल्या १९३१ मध्ये 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' हा आपला आठ प्रादेशिक कथांचा संग्रह प्रसिद्ध केला. 'आजचे व कालचे गोमंतक' असे त्याचे पर्यायी नाव आहे. गोव्यातील देवदासींची चाल व त्यांची होणारी कुचंबना, शेजार-शेजारच्या गावांतील वैर व त्यांची होणारी कुचंबना, गावकरी आणि गावातील श्रीमंत तसेच वतनदार यांच्यामधील हेवेदावे, परकियांच्या लाचारीला चटावलेली मनोवृत्ती इ. गोष्टी त्यांनी मांडल्या आहेत. ऐतिहासिक अभिमान, स्वदेशाविषयी अभिमान ही प्रामुख्याने त्यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये आहेत. वाङ्मयीन अनुभवासाठी एक प्रचंड क्षेत्र मोकळे आहे. अशा प्रकारची त्यांनी जाणीव करून दिली. त्यांचे कार्य ग्रामीण वाङ्मयाच्या क्षेत्रात महत्त्वाचे वाटते.

लक्ष्मणराव सरदेसाई यांनी गोमंतकाशी निगडित असे प्रादेशिक वाङ्मय लिहिले.

त्यांचे 'कल्पवृक्षाच्या छायेत',' सागराच्या लाटा', 'ढासळलेले बुरुज' इ. वैशिष्ट्यपूर्ण कथासंग्रह आहेत. रचनात्मक वैशिष्ट्यानुसार काही वैशिष्ट्ये त्यांच्या कथेत दिसून येतात.

१९३३ मध्ये प्रसिद्ध झालेला 'सुगी' संग्रह किंवा १९३४ ला प्रसिद्ध झालेल्या 'रानजाई' या ग.ह.पाटलांच्या संग्रहामधून ग्रामीणता प्रकट झाल्याचे जाणवते.

ग.ल.ठोकळ यांचा 'मीठभाकर' १९३८ ला प्रसिद्ध झाला यावर रवीकिरण मंडळाची छाया जाणवते. १९३८ नंतर श्री.ठोकळ ग्रामीण कथा, कादंबरीकडे वळल्याचे जाणवते. त्यांची कविता इतरांच्या तुलनेत अधिक सच्ची जाणवते.

❑ १९४० ते ६०

१९४१ मध्ये श्री.म.माटे यांनी 'उपेक्षितांचे अंतरंग' हा कथासंग्रह प्रसिद्ध केला. माटे यांच्या कथेतून शोषितांच्या-पीडितांच्या जीवनातील वास्तव भेदकता जाणवते. 'बन्सीधर आता तू कुठे रे जाशील', 'सावित्री मुक्यानेच मेली' या कथांतून येणारी पात्रे रुढी-परंपरातून बाहेर पडू शकत नाहीत. आक्रस्ताळेपणा हा त्यांचा स्वभाव नाही. कांही कथामधून दरोडेखोरांच्या मनातील माणुसकी व प्रामाणिकपणा ते अचूक टिपतात. 'गंगाराम', 'बहिरनाक' या पात्रांविषयी वाचकांच्या मनात अनुकंपा निर्माण करण्यात माटे यशस्वी होतात. स्वतः माटे पांढरपेशे असूनही त्यांनी उपेक्षित ग्रामीण कथेत जिवंतपणा आणला. अतिरंजित, ओबडधोबड कथा मार्टेनी आशयसंपन्न केली. 'उपेक्षितांच्या अंतरंगमध्ये ग्रामीण वास्तवाचे अस्सल रूप दिसते. शृंगार, काव्यमय प्रसंग, खटकेबाजपणा याचा वापर न करताही त्यांची कथा मनाचा ठाव घेते. खरे तर मराठी ग्रामीण कथेचे जनकत्व श्री.म.माटे यांच्याकडे जाते, असे प्रा.आनंद यादव यांनी म्हटले आहे, ते आपणाला पटते. माटे यांचा लेखनकाल फडकेयुग म्हणून ओळखला जातो. रोमँटिक प्रवृत्तीने पछाडलेल्या फडक्यांचा ठसा तत्कालीन अनेक लेखकावर उमटला.

ग.ल.ठोकळ यांनी १९४३ ला 'कडूसाखर' हा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध केला.

त्यांच्या कथेमधून रंजकता अधिक येत असल्याचे जाणवते. खेडेगावांतील अज्ञान, हाडवैर, माणसा-माणसांतील रानदांडगेपणा खेडेगावांतील सण-उत्सव, शेतीतील नाट्यपूर्ण प्रसंग, प्रेमप्रकरणे यांचे चित्रण त्यांच्या कथेतून दिसते. ग्रामीण कथा हा शब्दप्रयोग याच काळात रूढ झाला.

र.वा.दिघे, ग.ल.ठोकळ यांनी १९४० ते ४६ या काळात कथालेखन केले. कोकणचे जीवन, तेथील गरिबांच्या हालअपेष्टा यांचे चित्रण त्यांनी केले. प्रेमाच्या चित्रणातून प्रेमाचा त्रिकोण चित्रित केला. दिघे यांचे ग्रामीण लेखन विपुल आहे. अद्भुतता, कल्पकता, काव्यमयता, ग्रामसुधारणा, निसर्गवर्णने त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वानुसार आपल्या फडके वळणाच्या साहित्याला दिली. कित्येक वेळा इंग्रजीतील ग्रामीण वाङ्मयात दिसून येणारे ग्रामजीवन आणि तेथील व्यक्तींच्या भावभावना मराठी ग्रामीण कथेत ठोकळांनी आणलेल्या दिसतात. त्यामुळे त्यांच्या बऱ्याच कथांमधून ग्रामीण जीवनदर्शन बाजूला पडले. 'मनोरंजनासाठी नवा बदल हीच त्यांच्या साहित्याची प्रेरणा दिसून येते.

थोडक्यात असे म्हणता येईल की, ठोकळ-दिघे यांचे ग्रामीण मराठी वाङ्मय शुद्ध जीवन प्रेरणानी प्रेरित होण्यापेक्षा तत्कालिन ग्रामीण प्रेरणेने प्रेरित झालेले दिसते. 'सराई', 'पाणकळा' या कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवनप्रेरणावर अधिक भर दिला असल्याचे जाणवते. त्यांनी ग्रामीण वाङ्मय विपूल प्रमाणात लिहिले. ग्रामीण वाङ्मयाचा एक वाचकवर्ग या वाङ्मयाने निर्माण केला. तसेच ग्रामीण जीवनाविषयी वाचकांची उत्सुकता वाढवून ठेवली. त्यांची कथा मनोरंजनाच्या दृष्टीने प्रभावी असली, तरी ग्रामीणता व्यक्त करण्याच्या दृष्टिकोणातून प्रभावी ठरत नसल्याचे दिसून येते.

श्री.ना.पेंडसे यांनी १९४५ च्या आसपास ग्रामीण जीवन व्यक्त करणाऱ्या कथा-कादंबऱ्यांचे लेखन केले. त्यांच्या साहित्याला त्यांच्या विशिष्ट ग्रामप्रदेशातील वास्तवाची भक्कम बैठक दिसते. पारंपरिक ग्रामीण जीवनातील नितळता, भव्य निसर्ग, सच्चेपणा यामधून ग्रामीण रांगड्या माणसांचे चित्रण केले. त्यांची अभिव्यक्ती प्रभावी होती. विशेषतः ते ग्रामीण पूर्वापरतेची

तरफदारी करताना दिसतात. पेंडसे खांडेकर वळणाचे दिसतात तसेच खांडेकरांप्रमाणे त्यांची वृत्ती जीवनमूल्ये जोपासणारी वाटते, पण त्या वृत्तीचा अतिरेक दिसून येत नाही.

श्री.वामन चोरघडे यांनी पांढरपेशा जीवनाबरोबर ग्रामीण कथा लिहिल्या. जरी त्यांनी ग्रामीण कथा लेखन केले असले, तरी त्यांना ग्रामीण कथाकार म्हणून फारसे ओळखले जात नाही.

द.र.कवठेकर यांनी वामन चोरघडे यांच्याप्रमाणे पांढरपेशा जीवनाबरोबर ग्रामीण कथालेखन केले. यांनाही ग्रामीण कथाकार म्हणून मानत असल्याचे जाणवत नाही. 'कवठेकर' हे 'य.गो.जोशी' वळणाचे कथाकार वाटतात. कौटुंबिक भावना आणि संबंध यात त्यांची कथा रमत असल्याचे दिसून येते. बऱ्याच वेळा त्यांची कथा भावविवश वाटते. म.भा.भोसले यांनी ग्रामीण जीवनाच्या निष्ठेमधून ग्रामीण कथा लेखनात सातत्य राखले आहे. ती किंचितच संघर्ष जिवंतपणे पकडते. पण हा संघर्ष आकर्षक वाटत नाही. निवेदनशैलीत सरळपणा जाणवतो. जीवनाची अर्थपूर्णता सखोलपणे जाणवल्याचे आढळत नाही. त्यांची कथा ग्रामीण जीवनाशी प्रामाणिक असूनही कुठे जोर घेत नाही. त्यामुळे ते जरी कष्टाने व निष्ठेने कथालेखन करत असले तरी ग्रामीण कथेच्या प्रवाहातून बाजूला पडल्यासारखे वाटतात.

१९४५ च्या दरम्यान कलावादी प्रेरणेने ग्रामीण कथा लेखन केले.

व्यंकटेश माडगूळकर यांनी माणदेशी परिसराचे दर्शन आपल्या ग्रामीण कथातून घडविले. 'जांभळाचे दिवस', 'माणदेशी माणसे', ' बाजाराची वाट' इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध झाले. माणदेशाच्या दुष्काळी मातीत जगणारी, धडपडणारी वेडी-विंद्री, दुःखी, बेरकी अशी नानाविध प्रकारची माणसे त्यांनी पाहिली आहेत. या माणसांच्या स्वभावातून निर्माण होणाऱ्या घटना, गोष्टी, गमती, आपल्या कथांमधून रेखाटल्या आहेत. गावातील हेवेदावे, चुरस, भानगडी, गाव व महारवाडा यांचे संबंध, जनावरे, पिके, शेती यांतून निर्माण होणारे संघर्ष त्यांनी आपल्या कथांमधून आणले आहेत. 'कोंडिबा गायकवाड', 'धर्मा रामोशी', 'शिदा चांभार' या सारख्या व्यक्तीरेखा त्यांच्या

वैशिष्ट्यांसह उभ्या केल्या. 'बाजाराची वाट', 'कायसुदिक गेलं नाही', 'दुबळा बेत' इत्यादी कथा ग्रामीण जीवनातील आशयदृष्ट्या संपन्न आहेत. माडगूळकरांच्या वरून शांत दिसणाऱ्या कथात आतून भावनांचा सागर हेलावताना दिसतो. माडगूळकरांच्या पूर्वार्धातील कथालेखकावर श्री.म.माटे यांच्या कथेची काहीशी छाप पडलेली जाणवते. माडगूळकरांच्या कथेची वैशिष्ट्ये म्हणजे साहित्यातून कलात्मक अनुभव कसा प्रकट होतो याचेच आपल्या कथांमधून दर्शन घडविले. यासंदर्भात प्रा.म.द.हातकणंगलेकर म्हणतात "माडगूळकरांनी आपल्या ग्रामीण जीवनाची अस्सल व अभिजात नस पकडली. गहिऱ्या दुःखाच्या छायेत वावरणाऱ्या माणदेशी माणसांच्या मागे त्यांची लेखनी सावलीसारखी फिरली. लेखनाचे व जीवनाचे अमेय हित जाणले, तरीदेखील निरागस कलात्मकतेची विलक्षण साक्ष ती देतच राहिली"[४]

शंकर पाटील यांनी १९४९ च्या दरम्यान कथालेखनास सुरवात केली. 'रामाच्या पाऱ्यामंदी' ही कथा वसंत मासिकाच्या अंकामध्ये प्रसिद्ध झाली. 'ऊन', 'खेळखंडोबा', 'धिंड', 'आभाळ', 'शांकरकथा', 'वळीव' इ. कथासंग्रह प्रसिद्ध झाले. केवळ संख्येने नव्हे तर गुणांच्या दृष्टिकोनातून पाहता शंकर पाटलांची कथा सतत आठवणीत राहणारी आहे. त्यांनी आपल्या प्रकृतीधर्मानुसार कथालेखन केले असून माणूस त्याचे बाह्यविश्व व अंतरविश्व, कुटुंबातील माणसांची नाती, अशा व्यक्तिमनाचा शोध त्यांनी घेतला. त्यांची कथा व्यक्तिमनाचा एक-एक पापुद्रा उलगडत त्यांच्या तळाचा शोध घेते. त्यांची कथा घटना-प्रसंगांना दुय्यम स्थान देते. मानसिक आंदोलनांच्या रेखाटनानंतर कथा संपते. म्हणून वाचकांना बऱ्याच वेळा कथेत अपुरेपणा जाणवत राहतो. पण लेखकांच्या दृष्टीने ती कथा सांकेतिकतेपासून दूर आहे. कालपरत्वे बदलत्या ग्रामीण जीवनाचे यथार्थ चित्रण करण्यात पाटलांच्यामधील सृजनशील साहित्यिकाचा प्रत्यय येतो. बऱ्याच कथांतून स्वातंत्र्यानंतरच्या काळात आपल्या स्वार्थासाठी प्रत्येक क्षेत्र कसे भ्रष्ट केले गेले याचे चित्रण व्यंग्यात्मक पद्धतीने केले आहे. पात्रांच्या मनातील वेग व गुंतागुंत दाखविण्यासाठी निवेदनाची मांडणी आकर्षकपणे साधली आहे. कलात्मक जाणीव अधिक तीव्र करून ग्रामीण कथा अधिक समृध्द

केली. शंकर पाटलांच्या कथेचे वैशिष्ट्ये म्हणजे मानवी मनाच्या चित्रणासाठी संज्ञाप्रवाहाचा वापर केला. निवेदनासाठी वापरलेली खास वैशिष्ट्यपूर्ण भाषा हे त्यांच्या कथेचे आणखी एक वैशिष्ट्ये आहे. त्यामुळे ग्रामीण कथेच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा म्हणून शंकर पाटील यांची कथा मानली जाते. शंकर पाटील यांच्या कथेविषयी मत मांडताना मदन कुलकर्णी म्हणतात ''शंकर पाटील यांच्या अधिकांश कथा या माणसाच्या आयुष्यातील दुःख व्यक्त करणाऱ्या कथा आहेत. आपल्याला भोगाव्या लागणाऱ्या दुःखाविरुद्ध बंड करावे, पेटून उठावे इतके बळ त्यांच्यापाशी नाही. जीवनभर हे जडशील दुःख सहन करताना फक्त स्वतःच्या मताशी त्याचा पुनरुच्चार करीत राहणे असा एक उपचार त्यांच्यापाशी आहे. ही माणसे अडाणी आहेत, गतानुगतिक आहेत. त्यांच्या मनामध्ये, कुटुंबामध्ये, ग्रामव्यवस्थेमध्ये त्यांनीच जपलेले असे दोष आहेत. नि त्यामुळे ही माणसे दुःखे भोगीत आहेत.''[५]

'रणजित देसाई' यांच्याकथाविश्वात कोल्हापूर व त्याच्या आसपासचा परिसर याच्यातील ग्रामीण चित्रण केले आहे. 'रूपमहल', 'मधुमती', 'कणव', 'वैशाख' इत्यादी कथासंग्रहांमधून ग्रामीण वास्तव मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही ग्रामीण प्रवाहात स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान ते निर्माण करू शकले नाहीत. त्यांच्या कथा परिणामाच्या दृष्टीनेही यथातथाच आहेत. ऐतिहासिक कथेत इतिहासातील वास्तव व कल्पनाविलास यातून उत्कटता साकारली. त्यामुळे त्यांच्या कथेला रंजकतेचे आकर्षण आहे. मानवी जीवनातील एखादाच उत्कट, रोमहर्षक क्षण ते टिपतात. कथेची संयतभाषा, सूचकता ही वैशिष्ट्ये असली तरी रंजकता, योगायोग, चमत्कृती यामुळे त्यांच्या कथेने मराठी कथेच्या विकासात काही भर टाकल्याचे दिसत नाही.

द.मा.मिरासदार यांनी १९४६ च्या दरम्यान कथालेखनास सुरवात केली. 'माझ्या बापाची पेंड' हा त्यांचा पहिला कथासंग्रह माणसा-माणसातील वेगळेपणा, तऱ्हेवाईकपणा, गावापेक्षा वेगळ्या वृत्तीने वागण्याची पद्धती त्यांच्या कथेत दिसते. ग्रामजीवनातील बढाईखोर, इरसाल, भित्रट, धूर्त, कावेबाज, विक्षिप्त अशी माणसे कथेमधून निवडल्याचे दिसून येते. फसवणूक, चोऱ्या, प्रेते, भुते इत्यादी मुळातच रंजक असणाऱ्या विषयांची निवड केल्याने त्यातून मिश्किलपणा बाज

कथाना व पात्रांच्या स्वभावात आला. त्यांची शैली वरून गंभीर आणि कांही ठिकाणी भोळसट, बावळटपणा यांचा मुखवटा धारण करते. त्यांचा निवेदक नेहमी विसंगतीवर बोट ठेवून पुढे जातो. माणसाच्या स्वभावातील विसंगती, विनोदाच्या अंगाने दाखविणे हा ग्रामीण कथेच्या विकासातील एक टप्पा मिरासदारांनी आपल्या कथेतून मांडला कथांना दिलेल्या विशेषणाविषयी आनंद यादव म्हणतात, ''कथांना दिलेली विशेषणे ही नेहमी दिशाभूल करणारी असतात. ग्रामीण, विनोदी मनोविश्लेषणात्मक इ.विशेषणे ही अशाच प्रकारची आहेत. विनोदी कथा ही नुसती विनोदीच असली पाहिजे, तिच्यात गंभीर काहीच येता कामा नये किंवा मनोविश्लेषणात्मक कथा अव्वलापासून अखेरपर्यंत तशीच असली पाहिजे, हा आग्रह किंवा समज चुकीचा आहे. शिवाय सगळ्याच चांगल्या कथा मनाला आनंद देतात, चांगल्या अर्थाने मनोरंजन करीत असतात त्यासाठी ती काठोकाठ विनोदी असली पाहिजे असे काही नाही. कारण कोणतेही असो मिरासदारांच्या विनोदी कथांचा नंतरच्या काळात घाट बिघडून त्या किस्सेवजा होऊ लागल्या हे नाकारता येत नाही''[६]

आण्णाभाऊ साठे यांनी १९४७ च्या दरम्यान कथालेखनाला सुरवात केली. आण्णाभाऊंच्या कथेतील पात्रे अन्यायविरुद्ध बंड करून उठतात. चोऱ्या, मारामाऱ्या, दरोडे, खून अशा प्रकारचा हैदोस घालतात. त्यांची कथा ही स्वनुभवावर व वास्तवावर आधारलेली कथा आहे. कथेमधून दुःख, दैन्य, दास्य मांडले आहे, 'भानामती', 'फरारी','कृष्णाकाठच्या कथा' हे त्यांचे कथासंग्रह आहेत. माणसांचे दुःख त्यांचे प्रश्न परिणामकारकपणे त्यांनी मांडले. पण अद्भुतरम्यता व कल्पनाविलासामुळे त्यांची कथा ठोकळ, दिघे यांच्या लेखनाशी नाते सांगते असे वाटते. आण्णाभाऊ साठे यांच्या कथेतील आक्रोश, आडदांडपणा, भोगलेल्या व भोगत असलेल्या अत्याचारातून आलेला असला तरी ही कथा एकसुरी वाटते.

शंकरराव खरात हे अण्णाभाऊ साठे यांचे समकालीन लेखक आहेत. 'बारा बलुतेदार' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. जुन्या ग्रामव्यवस्थेत महार, मांग, रामोशी, कुंभार, कोळी, परीट, न्हावी, सुतार, लोहार, सोनार इत्यादी बलुतेदार व आलुतेदारांना ग्रामव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान

होते. त्यांच्या जीवनातील अनुभवावर त्यांनी कथारचना केली. शंकरराव खरातांनी ग्रामजीवनातील नवनवी क्षेत्रे आपल्या कथेतून व्यक्त केली आणि मराठी कथेचे क्षेत्र व्यापक बनविले. खरात आपल्या कथेतून वास्तवाशी अधिक जवळचे नाते सांगण्याचे तंत्र अवलंबतात व भावनांची तीव्रता चित्रित करत जातात. त्यातील सुक्ष्मता हेरतात. कधी पात्रांच्या संवादातून तर कधी तृतीयपुरुषी निवेदनातून ही ग्रामीणता वाचकांसमोर साकार करतात. भटक्या जमातीचे फार जवळून अनुभव घेतल्यासारखे वाटतात. ग्रामीण जीवनातील दैन्याच्या शोधात रूढी, संकेत, नियतीशरणता यांचाही पाठपुरावा करतात. घटना प्रधान व व्यक्तिप्रधान कथा ते लिहित जातात. समाजातील उपेक्षित लोकांच्याविषयी तळमळ कथेतून जाणवते. त्यांच्या कथेतील दलितत्व व ग्रामीणत्व यांची गुंफण मराठी कथेतील वेगळेपणा दर्शवितात खरात यांचा मानवताधर्म विशेष जाणवतो.

हमीद दलवाई यांनी कोकण परिसर कथामधून मांडण्याचा प्रयत्न केला. हिंदू-मुस्लिम संबंधावर त्यांनी अत्यंत मनःपूर्वक थोडे पण चांगल्या प्रकारचे लेखन केले आहे. महाराष्ट्रामधील खेड्यातील मुस्लिम समाजाच्या भावभावना ते अत्यंत तटस्थतेने आणि कलात्मकतेने रेखाटन करतात.

मधु मंगेश कर्णिक यांच्या कथातून कोकणी परिसर चित्रित केल्या. ते विस्तारशील वृत्तीचे लेखक वाटतात. त्यांना कलात्मकतेची जाण असल्याचे जाणवते. पण एखादे क्षेत्र आपल्या अधिपत्याखाली ठेवून त्यामध्ये ताकदीने उतरत जाण्याची, सखोलता भोगण्याची वृत्ती दिसत नाही. पण ते कथेसाठी एखादा विषय निवडून तो ओघवत्या शैलीत मांडण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसतात.

बाबा पाटील यांची कथा बदलत्या ग्रामीणतेचे चित्र रेखाटणारी आहे. 'एकूर' हा त्यांचा पहिला प्रसिद्ध कथासंग्रह. त्यांच्या कथेत भक्ती, मानवाच्या भावना, शेतकऱ्यांच्या व्यथा, वेदना यांचे प्रत्यही दर्शन घडते. त्यांनी आपल्या कथामधून निसर्गता जोपासली आहे. ग्रामीण माणसाला निसर्गाच्या सान्निध्यात कसे ओढग्रस्त अनुभव घ्यावे लागतात, हे साधण्याचा प्रयत्न केला.

त्यामुळे ग्रामीण प्रतिकांच्या आस्वादातून कथा आशयघन बनते.

वि.शं.पाटगावकर यांच्या कथेमधून नागर जीवनाचे चित्रण येते. 'कूळ', 'ब्रिज', 'माळावरचा आंबा' या कथामधून प्रामुख्याने ग्रामीणतेचा आविष्कार घडविला आहे. त्यांच्या कथेतून ग्रामजीवनाचे, दारूचा व्यवसाय, पोलिस खाते, दुःखाचे, खेड्यातील गुंड यांचे चित्रण येते. पण हे समग्र चित्रण पाहत असताना ग्रामीण परिसराचे यथार्थ चित्रण करण्यात यांची कथा कुठे तरी कमी पडत असल्याचे जाणवत राहते.

उद्धव शेळके यांचा 'शिळान आणि आठ कथा' हा पहिला ग्रामीण कथासंग्रह १९५८ ला प्रसिद्ध झाला. विदर्भातील जीवनाचे चित्रण त्यांच्या कथातून येते. या चित्रणाबरोबरच शहरात राहूनही हालअपेष्टांचे जीवन जगणाऱ्या ग्रामीण कष्टकऱ्यांचे दुःख आपल्या कथेतून मांडले आहे. एखादी गोष्ट सांगत असताना किंवा मुद्दा पटवून देत असताना ग्रामीण वाक्प्रचार किंवा म्हणी ते अचूकपणे वापरतात. ग्रामीणतेशी निगडित उपमा वापरतात, पात्रांचे तुटक बोलणे हेल काढून बोलणे, आक्रोश करणे तर काही वेळा आरडाओरड करणे हे सर्व बारकावे ते टिपतात. कथा साध्या सरळ आहेत. प्रसंगानुरूप मुक्त संवाद यामधून कथा उत्कटता गाठतात. जीवनाकडे पाहण्याचा लेखकांचा गंभीर दृष्टिकोन संवेदनशील मनाला हात घालतो. पात्रे कधी बोलभांड तर कधी अबोलपणे वावरत असतात. दुःख हा जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या या पात्राविषयी लेखकाच्या मनात सहानुभूती असली तरी प्रत्यक्ष अभिव्यक्ती हळवेपणापासून दूर आहे. एकत्र कुटुंब पद्धतीतील भिन्न-भिन्न व्यक्तींचे स्वभाव त्यातून स्त्रियांचा होणारा कोंडमारा चित्रित होतो. 'माय' ही त्यांची आशयसंपन्न ग्रामीण कथा आहे या कथेतील वऱ्हाडी स्त्रीचे दारिद्र्यग्रस्त चित्रण हृदयस्पर्शी आहे.

☐ १९६० ते ८०

रा.रं.बोराडे यांनी १९६० साली कथालेखनाला सुरवात केली मराठवाड्यातील शेतकरी व ग्रामीण जीवन तेथील बोली भाषेसह त्यांनी रेखाटले. ग्रामीण जीवनातील दैन्य व कारूण्य

अचूक हेरले त्यांचा 'पेरणी' हा कथासंग्रह १९६२ ला वाचकासमोर आला. त्यांच्या कथेत खेड्यातील दारिद्र्य, कष्ट, मानवी मनातील ताणतणाव, नात्यागोत्यातील गुंते, नाट्य, परावलंबित्व हे विषय येतात. तसेच ग्रामीण समूहमनाचे चित्रण येते. त्यांच्या कथेतील निसर्ग वैशिष्ट्यपूर्ण आहे. मानवी जीवनात वासनेची तीव्रता मनाला व्यापून टाकणारी आहे. बोराड्यांनी वासनेची अनेकविध रूपे मांडली आहेत. त्यांच्या कथेत वासना ही कधी व्यावहारिक साध्य प्राप्तीकरिता साधन म्हणून वापरली जाते. 'पेरणी' कथेत मेव्हणीशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त करणारा कास्तकरी मनाचा जावई खऱ्या अर्थाने मेव्हणीपेक्षा शेतीला अधिक महत्त्व देत असतो. ग्रामीण जीवनात शेतीला अनन्य-साधारण महत्त्व असते हे येथे जाणवते. अनेक कथांमधून खेड्यांतील बेरोजगारी व दैन्यावस्था यांचे भेदक चित्रण येते. यातूनच जीवनातील विविध प्रश्न, आशा-आकांक्षा साकारतात. बोराडे यांची कथा संथ वाटते. ते एखादा उन्मादक प्रसंगही संयमाने मांडत जातात. वाचकांना अंतर्मुख करून हादरवून सोडण्याची ताकद बोराडयांच्या कथेत असल्याची दिसून येते.

चंद्रकुमार नलगे यांनी १९६१-६२ पासून कथालेखनास सुरवात केली. 'पंढरीची वाट' या कथासंग्रहामूधन ग्रामजीवनातील स्त्री-पुरुषांच्या भावभावना व संस्कार याचे ते चित्रण करतात. त्यांना कल्पनारम्यता, अद्‌भुतता व रंजकता याची ओढ असल्याचे जाणवते. योगायोगाच्या वापरातून कृत्रिमपणे कथेचा केलेला शेवट यामुळे त्यांची कथा वास्तवापासून दूर जाते. चंद्रकुमार नलगे यांची कथा र.वा.दिघे, ग.ल.ठोकळ यांच्या कथेशी नाते जोडते.

आनंद यादव यांनी १९६३ पासून कथालेखनास प्रारंभ केला. 'खळाळ' हा त्यांचा पहिला ग्रामीण कथासंग्रह १९६७ ला प्रसिद्ध झाला. या पहिल्याच कथासंग्रहामधून ग्रामीण कथेचे आगळे वैशिष्ट्य जाणवले. प्रथमपुरुषी निवेदनातून ग्रामीण मनाच्या सुख-दुःखाने भिजलेल्या अनुभवाला मुळस्वरुपात वाचकांसमोर सादर केले. आपल्या कथामधून ग्रामीण जीवन, गावापेक्षा शेतीची पार्श्वभूमी उभी करून ग्राम्य जीवन साकार केले. त्यांनी निसर्गाची पाल्हाळिक वर्णने टाळली. कथेचा मध्यवर्ती सूर हेरून तोच नेमकेपणाने फुलवित नेऊन कथेची मांडणी केली. ग्रामीण जीवनातील

प्रतिमा व प्रतीके यांचा मार्मिक वापर करून कथावस्तूला अर्थगर्भता प्राप्त करून दिली. खळाळ मधील कथांना ग्रामीण जीवन व त्या जीवनाशी संबंधित शेती, मोठ, बैल, ग्रामीण रीतीरिवाज, सणवार, संकेत यांच्या मिश्रणातून व्यापकता व सुक्ष्मता प्राप्त झाली. यातील दारिद्रयपीडित माणसे मात्र एका विशिष्ट पातळीवर जीवन जगतात.

अनेक कथांमधून जिव्हाळयाने लेखकांनी चित्रण केले आहे. ग्रामीणतेच्या अपरिहार्य घटकाकडे लक्ष पुरविण्यात लेखकाच्या सूक्ष्म व व्यापक निरीक्षणक्षमतेचा प्रत्यय येतो. 'धूणं', 'चाकरी', 'वरातीचा शालू', 'सून' या समर्थ कथा आहेत. खळाळमधील कथामधून काव्यात्मकता प्रकट झाली आहे, तसेच त्यांच्या ग्रामीण कथेत गहिरेपणा जाणवतो. शेतकरी मजूर व शेतीशी संबंधित गुरे-ढोरे, पक्षी-कीटक, ग्रामीण मनाची सुक्ष्मता यातून सजीव व निर्जीव घटकांचा आत्मपर चिंतनशीलतेतून वापर करून ग्रामीण जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न करतात. जरी असे असले तरी त्याच्या या कथा शेतीपासून फार दूर जाऊ शकत नाहीत. मराठी ग्रामीण कथाविश्वाला वास्तवस्पर्शी व समर्थकतेची देण देणाऱ्या यादवांनी हे सातत्य पुढे टिकवल्याचे जाणवत नाही.

बी रघुनाथ यांनी मराठवाड्यातील प्रादेशिकतेचे यथार्थ चित्रण केले आहे. लेखकाच्या काळातील मराठवाड्यातील माणसाचे जिणे आपल्या कथामधून कलात्मकतेने मांडले आहे. परिस्थिती आणि माणसे यांना आचवलेल्या माणसांच्या मनातील द्वंद्व त्यांनी आपल्या कथामधून जिवंतपणे चित्रित केले आहे.

चंद्रकांत भालेराव व मुकुंदराव गायकवाड यांनीही मराठवाड्यातील ग्रामीण जीवन चित्रण केले आहे. निजामी राजवटीतील अन्याय, त्याविरुद्धचे दर्शन 'धर्माची बाब' या कथेमधून घडते, तर मुकुंद गायकवाड यांच्या 'तिरकट' या कथासंग्रहातून ग्रामीण माणसाचे दुःख, स्त्रीवरील अन्याय, अत्याचार याचे चित्रण पाहावयास मिळते.

रंगराव पाटील यांचा 'लाव्हर' हा पहिला कथासंग्रह कथेची नीटस मांडणी व

विषयाशी सुसंगत प्रसंगनिर्मिती ही त्यांच्या कथांची वैशिष्ट्ये. रंजकता या दोषामुळे त्यांची कथा वैशिष्ट्यपूर्ण ठरत नाही.

सखा कलाल यांच्या कथांचा ग्रामीण कथाप्रवाहात विचार करत असताना आवर्जून उल्लेख करावा लागतो अत्यंत सौम्य, संथ पण तरल रूपसौष्ठव लाभलेल्या या कथा ग्रामीणतेचे प्रत्ययकारी चित्रण करत जातात. 'ढग' या कथेत संयुक्त कुटुंबपद्धतीतील कथेची वीण जोपासलेली आहे. नित्याच्या भांडणाला कंटाळून वेगळ्या निघालेल्या मुलाच्या मनाची तगमग हळूवारपणे टिपताना फ्लॅशबॅकचा बिनतोडपणे वापर करून वाचकाला भूतकाळात नेलेले आहे. शेवटी पिता-पुत्रांचे रक्ताचे संबंध तुटत नसतात हा संदेश देऊन कथा संपते. समकालीन ग्रामीण कथाप्रवाहात कलालांनी चोखळलेली वाट करूणरम्य आहे. दुखद अनुभूतीचा गहिरेपणा प्रत्ययकारीकतेने मांडताना त्यांची तटस्थाची भूमिका कथेला अधिक सामर्थ्यसंपन्न करीत जाते. कथेतील पात्रे परिस्थितीला सामोरी जातात. सूडाची भावना त्यांच्या मनात दिसत नाही. यातनांची तीव्रता औदासिन्य निर्माण करते, पण हे औदासिन्य फार काळ टिकणारे नसते. तशा प्रकारचे एकंदर कलालांच्या कथेचे स्वरूप जाणवते.

महादेव मोरे यांच्या 'दवना' कथासंग्रहातील कथा एक प्रादेशिकतेची जाण देऊन जातात. 'इंगित' या ग्रामीण कथासंग्रहातील कथेतील लेखकाच्या प्रथगात्मक कथेचा समर्थ प्रत्यय येतो. ग्रामीण जीवनातील व्यथा-वेदनांकडे अत्यंत गंभीरपणे पाहून ते कथा लिहितात. ग्रामीणतेच्या वास्तव चित्रणात या कथा यशस्वी होतात. ग्रामीण कथाप्रवाहात त्यांचे स्थान निश्चित केले असले तरी या पलीकडे त्यांच्या कथेत अधिक सामर्थ्य प्रतीत होत नाही. त्यांच्या उत्तम कथादेखील वाचनियतेच्या पुढे सरकतात असे वाटत नाही.

१९७० नंतरच्या ग्रामीण कथालेखन करणाऱ्या ग्रामीण कथालेखकांत चारूता सागर यांचा समावेश होतो. यांनी कोल्हाटी, जोगणे, डोंबारी या दूर्लक्षित व उपेक्षित जाती-जमातीचे प्रत्ययकारी चित्रण केले आहे. 'दर्शन' ही त्यांची उत्कटकथा 'वाट' या कथेतही भटकंती करणाऱ्या

पारधी जमातीचे, तिच्या संस्कृतीचे केलेले चित्रण हालअपेष्टाग्रस्त समष्टीला एक अविस्मरणीय आविष्कार देऊन जाते. परंतु या पलीकडे या कथांना अधिक उंची गाठता आलेली नाही. त्यामुळे त्यांनी मराठी कथेला नवीन कक्षा प्राप्त करून दिली असे म्हणता येत नाही.

किसन चोपडे यांनी काही ग्रामीण कथा लिहिल्या 'तपासणी'सारख्या कथासंग्रहामधून बदलत्या ग्रामीण जीवनाची जाण व्यक्त केली आहे. जरी त्यांनी ग्रामीण जीवन मांडण्याचा प्रयत्न केला असला तरी हे सारे वरवरचे वाटत राहते. प्रवाह व प्रघात सांभाळण्याचा हा प्रश्न कथेला घनता देऊ शकत नाही. 'धार', 'आश्रयदाता', 'पिरियड' सारख्या नागरकथातून समाजातील वास्तव घटना, प्रसंग निवडलेले असले तरी कथा फारशी प्रभावी ठरत नाही.

आ.क.कुरुंदवाडे यांनी 'रक्ताचे नाते' या कथासंग्रहामधून ग्रामीणता मांडण्याचा प्रयत्न केला. 'शक्कल', 'वंशाचा दिवा' यासारख्या कथात काही सामर्थ्य स्थळे सापडतात. तर 'लॉटरी', 'पिळ', 'वाटणी' यासारख्या कथा केवळ गोष्टीरूप वाटतात. त्यांच्या कथा आटोपशीर असून निवेदनाच्या ओघात आलेल्या प्रतिमा व प्रतीके वापरून ग्रामीण जीवनाची अस्सलता जोपासतात.

**❑ समकालीन कथाकार व उत्तम बंडू तुपे यांची कथा**

खेड्यापाड्यांतून शिक्षणाची झालेली सुविधा, निघालेली शाळा-महाविद्यालये व त्यामधून पदव्या मिळवलेल्या आजच्या तरुणांची दयनीय अवस्था निर्माण झालेली आहे. आजच्या शिक्षणाने बेकारी कमी होण्याऐवजी वाढत आहे. त्यामुळे शिक्षणाची व्यर्थता जाणवावी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

गावात शाळा-महाविद्यालये झाली. सोसायट्या, बँका, यंत्रे आली, पण गावचे भकासपण संपलेले नाही. गलिच्छ सप्ताह, स्पर्धा त्यातून देशाला संकटात लोटायला निघालेले राजकीय नेते, त्यांना गरीब जनतेकडे पाहायला व त्यांच्या समस्या सोडवायला या नेत्यांना वेळ नाही

हे सर्व दृश्य भीषण आहे. हे सर्व आजच्या साहित्यिकांना आव्हान देणारे आहे. यापैकी बरचसे आपल्या शब्दात बांधण्याचा आजचा ग्रामीण साहित्यिक प्रयत्न करत आहे. १९८० नंतरच्या साहित्यामधून हे प्रकर्षाने येत आहे, याची जाणीव होते.

आजच्या परिस्थितीचे विदारक सत्य मांडण्याचा प्रयत्न अनेक साहित्यिक करत आहेत.

भास्कर चंदनशिव यांच्या कथेमधून येणारा परिसर हा मराठवाड्यातील 'बीड' व 'उस्मानाबाद' या सीमारेषेवरचा आहे. निसर्गाचे भुंडेपण, वैराण-उजाडपण त्यांच्या कथांतून प्रभावीपणे येते. 'जांभूळढव्ह', 'मरणकळा', 'अंगारमाती' व 'नवी वारूळे' हे त्यांचे कथासंग्रह आहेत.

'जांभूळढव्ह' मधील 'आग', 'जांभूळढव्ह','पाणी', 'एक होता नामा' या कथा मराठी ग्रामीण कथेला वेगळे वळण देणाऱ्या समर्थ कथा आहेत. चंदनशीव यांच्या कथेवर रहस्यवादाची पुसटशी झाक असल्याचे जाणवते. कथेतील घटना वर्णने व शब्दयोजना प्रभावी असल्याने त्याचा वाचकांवर चटकन प्रभाव पडतो. भास्कर चंदनशिव यांच्या कथेमधून एखादी विशिष्ट जात प्रतीत होत नाही. त्यांच्या कथेतील माणसे दुःखभोगी आहेत. त्यामुळे भास्कर चंदनशिव व वामन होवाळ यांची कथा उत्तम बंडू तुपे यांच्या कथेला समांतर जात असल्याचे जाणवते.

वामन होवाळ यांची कथा ग्रामीण जाणिवा घेऊन आली असल्याचे जाणवते. 'वारसदार' किंवा 'बेनवाड' या कथासंग्रहातील कथा महत्त्वाच्या वाटतात. वामन होवाळांचा ग्रामीण मातीशी असणारा संबंध अतूट आहे. त्यांची कथा ग्रामीण मातीशी असणारा संबंध प्रकट करत असताना दलित माणूस विसरत नाही. त्याला ग्रामीणतेची जोड देतात. त्याला त्यामध्ये रंगवितात व त्यातून त्यांचे दुःखही सांगण्याचा प्रयत्न करतात. तसेच वैगुण्यांवर नेमकेपणाने बोट ठेवतात.

'मजल्याचे घर' या कथेतील ग्रामीण भागातील जातीसंघर्ष मनात घर करून राहतो. त्याबरोबरच ग्रामीण भागातील जातीसंघर्षाची जाणीव होते.

उत्तम बंडू तुपे यांची ग्रामीण कथा ग्रामीणतेच्या चित्रणासोबत पददलित शेतकरी त्यांच्या व्यथा-वेदना आधुनिक शेतीचे स्वप्न साकार करू पाहते. त्यांचे वाङ्मय ग्रामीण व दलित यांच्या सीमारेषेवर असल्याने दलित व ग्रामीण साहित्यामधील फरक थोडक्यात मांडणे या ठिकाणी महत्त्वाचे वाटते.

वास्तविक पाहता ग्रामीण व दलित या संज्ञा प्राप्त झालेले साहित्य एकमेकांशी समांतर असे साहित्य आहे. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबूराव बागूल इ. सुरवातीचे लेखक जेव्हा लेखन करीत होते. तेव्हा ते ग्रामीण लेखकच म्हणून ओळखले जात होते. ग्रामीण हे साहित्यातील अभिव्यक्त आशयाचे विशेषण आहे. खेड्यात राहणारा दलित समाज हा ग्रामीण समाजाचाच एक घटक आहे. ग्रामीण साहित्य ही संज्ञा मूळातच व्यापक आहे. ग्रामीण माणूस मग तो दलित असो की दलितेतर असो, या साहित्याचा नायक आहे. याविषयीचे आपले मत मांडताना नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात ''ग्रामीण भागातील दलितांना केवळ जातीय पातळीवरील संघर्ष द्यावा लागतो असे नाही, तर संबंध ग्रामव्यवस्थेशी संघर्ष करावा लागतो. म्हणून अशा संघर्षाचे 'कुरूक्षेत्र' शेवटी ग्रामविभागाचे असते.''[७]

श्री.म.माटेंपासून आज लिहित असलेल्या लेखकापर्यंतचे ग्रामीण साहित्य बघितले तर ते एका विशिष्ट जातीचे आहे असे म्हणता येणार नाही. माडगूळकरांच्या 'बनगरवाडी'तील माणसे किंवा 'माणदेशी माणसे' कुठल्या जातीचे आहेत. खेड्यातील दलितांचे चित्रण हे प्रथम ग्रामीण माणसाचे चित्रण आहे. इथे वेशी आतचे व वेशी बाहेरचे असा वादच नाही. याप्रमाणे ज्या मर्यादापर्यन्त खेड्याचा संबंध आहे ते दलित माणसाचे चित्रण करणारे असले तरी ते ग्रामीणच आहे. ग्रामीण व दलित साहित्य हे वैचारिक भूमिकेतून समांतरच आहे. त्यामुळे 'उत्तम बंडू तुपे' यांचे

साहित्य हे अशा प्रकारच्या सीमारेषेवरील साहित्य असल्याचे मानावे लागते. ते जरी जन्माने दलित असले तरी त्यांच्या ग्रामीण साहित्यातील जाणिवा या ग्रामीण जाणिवा आहेत. 'उत्तम बंडू तुपे' यांचे सर्व बालपण खेडयापाडयांमधून गेले असल्याने त्यांचे सर्वच अनुभव ग्रामीण जाणीवा व्यक्त करणारे आहेत.

उत्तम बंडू तुपे हे भास्कर चंदनशिव व वामन होवाळ यांचे समकालीन लेखक आहेत. साधारणतः १९४७ पासून उत्तम बंडू तुपे कथालेखन करत आहेत. रंगराव पाटील यांच्या 'विज्ञापना' दिवाळी अंकात त्यांची 'हुंडा' ही पहिली ग्रामीण कथा प्रकाशित झाली. त्याचा १९८६ ला 'आंदण' हा ग्रामीण जाणिवा व्यक्त करणारा कथासंग्रह प्रकाशित झाला. बऱ्याच दशकानंतर त्यांचा हा कथासंग्रह 'कोंबारा' १९९१ ला प्रकाशित झाला. तर 'माती आणि माणसं' १९९३ ला प्रकाशित झाला. ग्रामीण जीवनापेक्षा ग्रामीण भागातील उपेक्षित जाती-जमाती, शेतकरी व शोषित स्त्रियांचे जीवन मांडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे स्वानुभवाच्या बळावर ग्रामीण परिसर उठावदार बनविला.

उत्तम बंडू तुपे यांच्यानंतरही आजच्या ग्रामीण साहित्याची परिस्थिती पाहत असता एक प्रचंड पिढी आज ग्रामीण साहित्य काही वेळा वेड्यावाकड्या स्वरुपात निर्माण करीत आहे. त्यांचा साहित्यनिर्मितीचा उत्साह अनिवार आहे. न्यूनगंड बाजूला ठेवून इतर प्रतिष्ठित लोकांच्या मांडीला मांडी लावून बसण्याची जिद्द आणि आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाला आहे. त्यामुळे उत्तम बंडू तुपेंच्या समकालीन लेखकांचा थोडक्यात आढावा घेणे गरजेचे वाटते.

गणेश आवटे यांचा 'कागूद' हा ग्रामीण कथांचा संग्रह प्रसिद्ध आहे. ग्रामीण जाणिवा व्यक्त करणारी 'पाहुणी' ही कथा 'सुलूच्या' जीवनाची परवड व्यक्त करणारी वाटते. 'कागूद' कथेतील 'पल्र्याला' उसणे पैसे देणारा 'राजाराम पाटील' पल्र्याच्या मृत्यूनंतरही त्यांच्या कुटुंबाला छळत राहतो. एक गतिमान शैली व आकारबद्ध रचना यातून मनामध्ये अनेक कप्पे उलगडण्याचे तंत्र 'गणेश आवटी' यांना सापडले असल्याने त्यांची कथा प्रभावी वाटते.

श्रीराम गुंदेकर हे एक महत्त्वाचे ग्रामीण लेखक आहेत. 'उचल' हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध आहे. त्यांचे कथासंग्रहातील लेखन मंद असले तरी बदलते खेडे आणि या खेड्यातून शिक्षणाच्या प्रसारामुळे तरुणांना नवीन दृष्टी लाभल्याचे जाणवते.

प्रतिमा इंगोले 'हजारी बेलापान' हा ग्रामीण जीवन व्यक्त करणारा पहिला ग्रामीण कथासंग्रह वऱ्हाडी जीवनाचे चित्रण करतो. वाक्प्रचार व म्हणींचा वापर यातून या कथाना खुसखुशीतपणा लाभला असला तरी या कथा एकपदरी वाटतात. प्रसंगचित्रण उभी करण्याची ताकद या कथांतून जाणवते.

सतीश तराळ यांचा 'आळ' हा ग्रामीण कथासंग्रह वऱ्हाडी ग्रामीण जीवनातील शोषितांच्या व्यथा-वेदना रेखाटतात. 'आग' या दुसऱ्या कथासंग्रहामधून ग्रामीण जीवनाबरोबरच वृत्तीचा मागोवा घेताना दिसतात.

बाबाराव मुसळे यांची कथा ग्रामीण वास्तवातील भेदकता हेरत असल्याचे जाणवते. कथेतील ग्रामीण समस्यांचे पडसाद वर्तमान वास्तवाची प्रखर प्रचीती देतात. गंभीर रेखाटनाबरोबर लेखकाच्या सहानुभूतीची जाणीव होते.

संतोष मुळावकर यांची कथा वऱ्हाडी मातीत रुजली आहे. ग्रामीण जीवनातील ताणतणाव ते तपशीलाने टिपतात. त्यांच्या संवेदनशील अनुभूतीने कौटुंबिक अंतरंग उजळून निघते. त्यांचा हा आत्मविश्वास आत्मनिष्ठेकडून आत्माविष्काराकडे वळणारा जाणवतो. लेखकाची सत्य वृत्ती ग्रामीण अंतरंगाचे पीळ उलगडत नेते.

अशोक मानकर यांची कथा रोचक वाटते. लहान कथाबीजातून साकारलेले अनुभव उत्कट वाटतात. एका निर्भेळ मनाने घेतलेला ग्रामीणतेचा वेध वाचकाला अंतर्मुख करणारा आहे.

'नागनाथ कोत्तापल्ले' यांनी नागर जीवनातील चित्रण केले. त्याबरोबरच ग्रामीण जीवन दर्शन घडविणाऱ्या कथा लिहिल्या. 'दिवार', 'पाऊस' या कथांमधून खेड्यांतील श्रद्धा, प्रथा व मानवी मनावर त्याचा प्रभाव याचे वर्णन येते.

सोपान हळमळकर यांनी आपल्या कथामधून मराठवाड्यातील जीवनचित्रण केले. 'रेडू' या कथेमधून मराठवाड्यातील उशिरा आलेल्या यंत्रयुगाची मांडणी केली.

आनंद पाटील यांनी 'फुगडया'सारख्या कथेमधून बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण केले. ग्रामीण भागातील शिकलेला तरुण शहरात गेल्यानंतर त्यांच्या वाटयाला आलेल्या दुभंगलेपणाचे अनुभव उत्कटपणे चित्रित केले.

बा.ग.केसरकर यांनी 'कानकोंडी'सारख्या कथेमधून स्त्रीचे उपेक्षेचे, अवहेलनेचे चित्र रेखाटले आहे. नवऱ्याने सवत आणल्याने प्रथम पत्नीची माहेरी व सासरी कशी उपेक्षा होते याचे प्रभावी वर्णन केले आहे.

यानंतरच्या पिढीतील ग्रामीण लेखकांनी बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण केले. राजन गवस, विश्वास पाटील, रामचंद्र पठारे, रवींद्र ठाकूर, तानाजी राऊ पाटील या कवी-लेखकांच्या लेखनातून ग्रामीण जीवनाचे वास्तव रूप प्रकट होत गेले.

याबरोबरच आधीच्या पिढीतील रा.रं.बोराडे, आनंद यादव, चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे इ. लेखकांनी आता नवे वळण घेतल्याचे जाणवते.

१९६० नंतरच्या ग्रामीण साहित्याचा प्रवाह हा महत्त्वाचा प्रवाह आहे. त्यात कथा हीच प्रमुख आहे. यासंदर्भात प्रा.आंबादास माडगूळकर व सूर्यकांत खांडेकर म्हणतात, "मराठी वाङ्मयात ग्रामीण कथेचे स्वतंत्र व समृध्द दालन आहे. नाट्यछटा किंवा विडंबन काव्य हे वाङ्मय प्रकार जसे रूढ झाले आणि विराम पावले तसे होण्याची ग्रामीण कथेबाबत भीती नाही. कारण

खेड्यात ज्या प्रमाणात सुशिक्षित वर्ग वाढत जाईल त्या प्रमाणात ग्रामीण अनुभवाचे प्रकटीकरण जास्त प्रमाणात होण्याची शक्यता आहे, असे आतापर्यंतच्या अनुभवावरून वाटते.''[८]

**वरील विवेचनावरून ग्रामीण कथावाङ्मयाविषयी निरीक्षणे नोंदविता येतील :-**

मराठी ग्रामीण कथेच्या पूर्वपीठिकेचा आढावा घेत असताना हरिभाऊंच्या 'काळ तर मोठा कठीण आला' या कथेची नोंद घेणे गरजेचे वाटते.

ग्रामीण जीवनाचे हुबेहूब चित्रण श्री.म.माटे यांच्या कथेमधून घडते म्हणून ते ग्रामीण कथेचे जनक ठरतात.

स्वातंत्र्यपूर्व ग्रामीण कथा ही प्रामुख्याने परकियांच्या लाचारीला चटावल्याचे जाणवते. त्यामुळे त्यांच्या मनोवृत्तीतील लाळघोटपणा दिसून येतो.

१९६० नंतरच्या कालावधीत आनंद यादव, रा.रं.बोराडे, सखा कलाल इत्यादींनी मराठी ग्रामीण कथा विकसित केली.

शंकर पाटील, द.मा.मिरासदार, शंकरराव खरात, उद्धव शेळके आदींनी मराठी ग्रामीण कथेचे क्षितीज विस्तारित केले. मनोविश्लेषण ग्रामजीवनातील दुःख, दारिद्रय इ. संज्ञा प्रवाहांचे प्रयोजन ही यांच्या कथांची वैशिष्ट्ये ठरतात.

आज गुणात्मकतेबरोबर संख्यात्मकदृष्ट्या ग्रामीण कथेचा विचार करता स्वातंत्र्यपूर्व कालखंडाच्या तुलनेत ती बऱ्याच मोठया प्रमाणात लिहिली जात आहे.

सामान्यपणे ग्रामीण कथाकारांच्या चार पिढ्या आपणासमोर येतात.

१९७२ च्या आसपास बदलत्या ग्रामीण जीवनाच्या चित्रणातून एक आगळे स्वरूप जाणवू लागले.

१९८६ च्या दरम्यान उत्तम बंडू तुपे यांनी बदल्यात जीवनाचा वेध घेऊन ते साहित्यामधून मांडले.

मराठी ग्रामीण कथेने ग्रामीण साहित्य चळवळीला हातभार लावला. तसे मराठी कथेच्या क्षितीज विस्तारणीकरणाला हातभार लावला.

## संदर्भ


१) चवरे, रा.गो. 'मराठी कथा : प्रवृत्ती आणि प्रवाह'
अमरावती, मराठी जनसाहित्य परिषद,प्र.आ. १९९५,
पृ.२५८

२) कोत्तापल्ले,नागनाथ 'ग्रामीण साहित्य स्वरूप शोध'
पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस १९८५, पृ.१५

३) यादव, आनंद 'मराठी साहित्य समाज आणि संस्कृती',
पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, प्र.आ.१९९५,
पृ.१२६

४) हातकणंगलेकर, म.द. 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका'
जुलै-डिसेंबर १९८०,
पृ.५३

५) कुलकर्णी, मदन 'समकालीन साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह'
नागपूर,१९८५,उन्मेष प्रकाशन, प्र.आ.१९८५
पृ.२५४

६) यादव, आनंद 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या',
पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, तृ.आ. १९९३,
पृ.५१

७) कोत्तापल्ले,नागनाथ 'ग्रामीण साहित्य स्वरूप शोध'
पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९८५,
पृ.१५

८) (संपा) माडगूळकर, अंबादास, खांडेकर सूर्यकांत, 'मराठी ग्रामीण कथा',

पुणे,ठोकळ प्रकाशन,प्र.आ. १९६७

पृ.५८

****